**सं.फौ.ख.क्र. ९२१/२०२३**
**सरकार वि. स्वप्नील ठाकरे**
**नि. क्र. २४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ चे शपथेवर बयान सुरु</u>**

माझे नाव :- प्रमोद अंबादासराव कंठाळे,
माझे वय :- ४६ वर्ष,
माझा व्यवसाय :- खाजगी नोकरी,
राहणार :- निंभोरा, अमरावती, ता. जि. अमरावती.

**सरकारी अभियोक्ता खंडारे यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, सरकारी साक्षीदार हजर. आरोपी हजर व त्याचे वकील हजर. सबब, कलम ३०९(२) प्रोव्हीजो ४ अन्वये सरतपास वगळण्यात आला. साक्षीदाराला साक्ष देण्यास सांगण्यात आले. साक्षीदार सांगतो की,**

**१.** मी आरोपीला ओळखत नाही. घटनेबाबत मला काहीही माहित नाही. मयत सुरेश तायडे यांना मी ओळखतो. ते अमरावती रोडवरील सिद्धार्थ हॉटेलसमोर असलेल्या इंडियन ऑईल, पेट्रोल पंपावर चौकीदार म्हणुन कार्यरत होते. मी फिर्यादीला ओळखत नाही. घटना ही प्रत्यक्ष माझ्यासमोर घडलेली नाही. घटना कधी घडली होती हे मला आठवत नाही. घटनेच्या दिवशी मला एका अनोळखी ईसमाचा फोन आला होता, त्याने मला फोनवर माहिती दिली की, तुमच्या पेट्रोल पंपावरील चौकीदाराचा जिनींगजवळ अपघात झाला आहे, असे सांगितले असता मी कंपनीच्या कमांडो गाडीमध्ये चालक म्हणुन असलेले दिपक गोलाईत व रमेश गोलाईत यांना घेवुन घटनास्थळी गेलो असता मयत सुरेश तायडे हे बेशुद्ध अवस्थेत पडलेले दिसले. त्यानंतर त्यांना आम्ही सरकारी दवाखाना, नांदगाव खंडेश्वर येथे उपचाराकरीता घेवुन आलो. त्यांना तेथे दवाखान्यात आम्ही भरती केले व त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आलो. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते. त्यांना कोणत्या गाडीने धडक मारली तसेच गाडीचा नंबर मला आजरोजी आठवत नाही. याव्यतिरीक्त मला काहीही सांगायचे नाही.

**<u>आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास ॲड. ए. एस. बावनकुळे वकील यांचे मार्फत</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोल पंपावरील माझी कामाची वेळ ही सकाळी ८.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत असते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मला एका अनोळखी ईसमाचा फोन आला होता, त्याने मला फोनवर माहिती दिली की, तुमच्या पेट्रोल पंपावरील चौकीदाराचा जिनींगजवळ अपघात झाला आहे, असे सांगितले असता मी कंपनीच्या कमांडो गाडीमध्ये चालक म्हणुन असलेले दिपक गोलाईत व रमेश

गोलाईत यांना घेवुन घटनास्थळी गेलो असता मयत सुरेश तायडे हे बेशुद्ध अवस्थेत पडलेले दिसले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे बयाण घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**पुर्नःतपास काही नाही.**

दिनांक – १०.०७.२०२५

सा.वा.दा.ब.अ.क.के.

CHHAYA SHAMKUMAR MEHARE Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE Date: 2025.07.10 16:53:54 +0530

**(छाया शा. मेहरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.
न्यायालय क्र. २

श्रवणोत्तर स्विकृत,

CHHAYA SHAMKUMAR MEHARE Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE Date: 2025.07.10 16:53:58 +0530

**(छाया शा. मेहरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.
न्यायालय क्र. २